तरूण भारत

# 'असमानता आणि दारिद्र्य'चे मंगळवारी प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'असमानता आणि दारिद्र्य" (**Inequality and Poverty**) पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी, १५ रोजी सायकांळी ४ वाजला ऑनलाईन होणार आहे. डॉ. जगन कराडे आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. प्रकाशन सोहळ्यानंतर पुस्तकावर चर्चा होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
12 FEB 2022 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# असमानता आणि दारिद्र्य ग्रंथाचे विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर (प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने असमानता आणि दारिद्र्य (Inequality and Poverty) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा येत्या मंगळवारी (दि. १५ फेब्रुवारी) सायकांळी ४ वाजता ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. डॉ. जगन कराडे आणि डॉ. राजेंद्र पाटील यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यास भारती विद्यापीठ तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्रकाशन सोहळ्यानंतर पुस्तकावर चर्चा होणार असून त्यात राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मान्यवर सहभागी होणार आहेत. यामध्ये डॉ. विद्युत जोशी (गुजरात), डॉ. आर. इंदिरा (कर्नाटक), डॉ. आनंद कुमार (गोवा), डॉ. वेन्केटेश्वरलु (आंध्रप्रदेश), डॉ. एस. गुरुस्वामी (तमिळनाडू), डॉ. अरविंदर अन्सारी (नवी दिल्ली), डॉ. बिस्वजीत घोष (पश्चिम बंगाल), डॉ. नागराजू गुंडेमेडा (हैदराबाद) यांचा समावेश आहे. हा ग्रंथ रावत पब्लिकेशन या प्रतिष्ठित प्रकाशन कंपनीमार्फत प्रकाशित होतो आहे.

पुस्तकाविषयी थोडक्यात- असमानता' हे भारतीय समाजासमोरील मोठे आव्हान आहे. जात, वर्ग, वंश, लिंग, स्थान, भाषा, व्यवसाय, भौतिक स्थिती आणि संसाधनांमध्ये असमानतेवर आधारित वितरण तसेच बहुसंख्य गटांचे संसाधनांचे मूलभूत मानवी हक्क नाकारल्यामुळे सत्ता, संपत्ती आणि अधिकाराचे असमान वितरण यामुळे समाजात विषमता निर्माण होत आहे. मानवी विकासासाठी सर्व मानवी हक्क महत्त्वाचे आहेत आणि स्वाभाविकपणे ते गरिबीत प्रतिबिंबित झाले आहे.

12 FEB 2022

**लोकमत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. जी. डी. यादव यांचा आंतरराष्ट्रीय सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे माजी संचालक आणि प्रा. डॉ. पद्मश्री गणपती डी यादव यांची अमेरिकेच्या नॅशनल अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगच्या (एनएई) फेलोशीपसाठी निवड करण्यात आली आहे. जागतिक स्तरावर अभियांत्रिकी संशोधन, सराव



किंवा शिक्षणात उत्कृष्ट योगदान देणाऱ्यांना ही फेलोशीप मिळते.

ग्रीन केमिस्ट्री, कॅटॅलिसिस, नॅनोटेक्नॉलॉजी आणि केमिकल इंजिनिअरिंगमधील संशोधन, नवकल्पना आणि शिक्षणात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे ही फेलोशिप त्यांना मिळाली आहे. आतापर्यंत फक्त २३ भारतीय नागरिकांना ही सदस्यता मिळाली असून, सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आयसीटीचे पाच माजी विद्यार्थी आहेत. यामध्ये डॉ. माशेलकर, प्रा. एम. एम. शर्मा, मुकेश अंबानी, प्रा. जे. बी. जोशी आणि प्रा. जी. डी. यादव यांचा समावेश आहे.


तरुण भारत

# सरदार मुजुमदार स्मृती पुरस्कार पं. सुधीर पोटे यांना जाहीर

▪ गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील गायन समाज देवल क्लबच्यावतीने यंदाचा 'सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज स्मृती पुरस्कार' पंडीत सुधीर पोटे यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवारी, १३ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत. पुरस्कार वितरणानंतर पं. पोटे यांचा गायन अविष्कार, 'मुक्त संगीत संवाद' कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांनी दिली.



देवल क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी देवल क्लबचे सचिव सचिन पुरोहित, खजानीस राजेंद्र पित्रे, डॉ. आशुतोष देशपांडे, संचालक श्रीकांत डिग्रजकर उपस्थित होते.

ते म्हणाले, सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्याकडे जवळपास ३५०० हून अधिक शास्त्रीय संगीतावरील ग्रंथ, व १ हजारांहून अधिक दुर्मिळ हस्ताक्षरे आहेत. ते गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे यांचे गुरू होते. राजर्षी शाहू महाराजांच्या दरबारात बीनकार व राजगायक असलेल्या बळवंतराव पोरे बुवा यांच्याकडून आबासाहेब मुजुमदार यांना संगीताचे बाळकडू मिळाले होते. जवळपास ४० तंतू घनवाद्ये ते स्वत: वाजवत. इसराज, सारंगी, दिलरूबा, सरोद वाद्ये ते वाजवत. ध्रुपद, ठुमरी, टप्पा, भजन, ख्याल सादर करत. सर्वसाधारण ३ हजार रचना त्यांच्या संग्रही होत्या. मुजुमदार यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांनी देवल क्लबला देणगी दिली आहे. या देणगीतून देवल क्लब व मुजुमदार कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज स्मृती पुरस्कार' दिला जातो. पहिल्या वर्षी हा पुरस्कार गायक पं. विनोद डिग्रजकर यांना दिला होता. यंदाचा पुरस्कार प. सुधीर पोटे यांदा देण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरणानंतर पोटे यांचा 'कानडा काफिरा' सांगितिक कार्यक्रम होणार आहे. यात डॉ. विनोद ठाकूर-देसाई, गौरी पाध्ये, अमित साळोखे, प्रशांत देसाई सहभागी होणार आहेत.

12 FEB 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीमशास्त्रज्ञ डॉ. जाधव यांना 'क्युबा'चा इनोव्हेशन पुरस्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



प्रा.डॉ. ए.डी. जाधव

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरीकल्चर'चे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी क्युबा देशाच्या रेशीमविषयक विकासात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना क्युबा सरकारने इनोव्हेशन पुरस्काराने गौरविले आहे.

डॉ. जाधव २०१२ पासून क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासविषयक धोरणाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मंत्रालयाच्या 'डेव्हलपमेंट ऑफ दि व्हॅल्यू चेन ऑफ सेरीकल्चर इन क्युबा ऑन सस्टेनेबल डेव्हलपमेंट' प्रकल्पावर मार्गदर्शक वैज्ञानिक म्हणून काम पाहत आहेत.



**कोल्हापूर : क्युबाच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या मंत्र्यांच्या हस्ते डॉ. ए. डी. जाधव यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना क्युबा येथील राष्ट्रीय रेशीमशेती प्रकल्पाच्या व्यवस्थापक अदिलैदिस रुईझ बार्सेनाज.**

त्यांच्या योगदानाच्या गौरवाप्रीत्यर्थ क्युबा सरकारतर्फे 'इनोव्हेशन ॲवॉर्ड-२०२१' देऊन सन्मानित करण्यात आले.

हवाना येथे २ फेब्रुवारी रोजी पुरस्कार वितरण सोहळा झाला. क्युबाचे विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण उपमंत्री जोस फिडेल सन्ताना न्युएझ यांच्या हस्ते व क्युबाच्या कम्युनिस्ट पक्षाचे प्रथम सचिव लुई अँटोनिओ टोरस इरिबर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. डॉ. जाधव यांच्या वतीने क्युबा येथील राष्ट्रीय रेशीमशेती प्रकल्पाच्या व्यवस्थापक अदिलैदिस रुईझ बार्सेनाज यांनी हा पुरस्कार स्वीकारला. क्युबातील भारतीय राजदूत सर्वेसर्वन जानकीरामन यांनी डॉ. जाधव यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले.

> डॉ. ए. डी. जाधव अनेक वर्षे क्युबा सरकारला रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करीत आहेत. त्याचा लाभ तेथील शेतकऱ्यांसह स्थानिक उद्योगांना मोठ्या प्रमाणावर होत आहे, ही बाब महत्त्वाची आहे. त्यांच्या योगदानाचा तेथील सरकारकडून पुरस्कार देऊन झालेला गौरव शिवाजी विद्यापीठ व भारतासाठी अभिमानास्पद क्षण आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

लोकमत

# ए. डी. जाधव यांचा क्युबाच्या 'इनोव्हेशन' पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



प्राणीशास्त्र अधिविभागातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स अँन्ड इनक्युबेशन इन सेरिकल्चर'चे समन्वयक आणि रेशीमशास्त्रज्ञ डॉ. ए. डी. जाधव यांनी क्युबा देशाच्या रेशीमविषयक विकासामध्ये योगदान दिल्याबद्दल त्यांना क्युबा सरकारने 'इनोव्हेशन' पुरस्काराने सन्मानित केले.

डॉ. जाधव हे २०१२ पासून क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासविषयक धोरणाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मंत्रालयाच्या 'डेव्हलपमेंट ऑफ दि व्हॅल्यू चेन ऑफ सेरिकल्चर इन क्युबा ऑन सस्टेनेबल डेव्हलपमेंट' या प्रकल्पावर ते मार्गदर्शक वैज्ञानिक म्हणूनही काम पाहात आहेत. हवाना येथे दि. २ फेब्रुवारी रोजी पुरस्काराचे वितरण झाले. डॉ. जाधव यांच्यातर्फे क्युबा येथील राष्ट्रीय रेशीमशेती प्रकल्पाच्या व्यवस्थापक अदिलैदिस रुईझ बार्सेनाज यांनी हा पुरस्कार स्वीकारला. दरम्यान, क्युबा येथील 'सेंटर फॉर रिसर्च इन प्रोटिन प्लँट्स अँड बायोनॅचरल प्रोडक्ट्स'च्या सरसंचालक डॉ. मारिया डेल कार्मेन पेरेझ हमांडेझ यांनी डॉ. जाधव यांना पत्र पाठविले आहे.

> डॉ. जाधव यांच्या योगदानाचा क्युबामधील सरकारकडून पुरस्कार देऊन झालेला गौरव हा शिवाजी विद्यापीठ आणि देशासाठी अभिमानास्पद आहे.
>
> \- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

12 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीमशास्त्रज्ञ डॉ. जाधव यांना इनोव्हेशन पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरीकल्चर'चे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी क्युबा देशाच्या रेशीमविषयक विकासामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना क्युबा सरकारने इनोव्हेशन पुरस्काराने गौरविले आहे. डॉ. जाधव हे २०१२ पासून क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासविषयक धोरणाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मंत्रालयाच्या 'डेव्हलपमेंट ऑफ दि व्हॅल्यू चेन ऑफ सेरीकल्चर इन क्युबा ऑन सस्टेनेबल डेव्हलपमेंट' या प्रकल्पावर ते मार्गदर्शक वैज्ञानिक म्हणूनही काम पाहात आहेत. त्यांच्या या योगदानाच्या गौरवाप्रीत्यर्थ क्युबा सरकारतर्फे 'इनोव्हेशन ॲवॉर्ड-२०२१' देऊन सन्मानित करण्यात आले.



क्युबाचे विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण उपमंत्री जोस फिडेल सन्ताना न्यूएझ यांच्या हस्ते आणि क्युबाच्या कम्युनिस्ट पक्षाचे प्रथम सचिव लुई अँटोनिओ टोरस इरिबर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ झाला. डॉ. जाधव यांच्या वतीने क्युबा येथील राष्ट्रीय रेशीमशेती प्रकल्पाच्या व्यवस्थापक अदिलैदिस रुईझ बार्सेनाज यांनी हा पुरस्कार स्वीकारला. त्याचप्रमाणे डॉ. जाधव यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचे दूरध्वनीवरून अभिनंदनही केले.

## भारतासाठी अभिमानास्पद क्षण

डॉ. ए. डी. जाधव हे गेली अनेक वर्षे क्युबा सरकारला रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करत आहेत. त्याचा लाभ तेथील शेतकऱ्यांसह स्थानिक उद्योगांनाही मोठ्या प्रमाणावर होत आहे, ही बाब महत्त्वाची आहे. त्यांच्या योगदानाचा तेथील सरकारकडून पुरस्कार देऊन झालेला गौरव हा शिवाजी विद्यापीठासाठी आणि भारतासाठीही अभिमानास्पद क्षण आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

12 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. ए. डी. जाधव यांचा क्यूबात गौरव

## इनोव्हेशन पुरस्कार प्रदान ; रेशीमविषयक विकासात भरीव संशोधन

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील **डॉ. ए. डी. जाधव** 'सेंटर ऑफ एक्सलन्स ॲण्ड इनक्युबेशन इन सेरीकल्चर'चे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी क्यूबा देशाच्या रेशीमविषयक विकासात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना क्यूबा सरकारने इनोव्हेशन पुरस्काराने गौरविले आहे.

डॉ. जाधव २०१२ पासून क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीमशेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासविषयक धोरणाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. मंत्रालयाच्या 'डेव्हलपमेंट ऑफ दि व्हॅल्यू चेन ऑफ सेरीकल्चर इन क्युबा ऑन सस्टेनेबल डेव्हलपमेंट' प्रकल्पावर ते मार्गदर्शक वैज्ञानिक म्हणूनहीकाम पाहत आहेत. त्यांच्या योगदानाच्या गौरवाप्रित्यर्थ क्युबा सरकारतर्फे 'इनोव्हेशन ॲवॉर्ड-२०२१'देऊन सन्मानित करण्यात आले. दोन फेब्रुवारीला हवाना येथे पुरस्कार वितरण सोहळा झाला.

> **“ डॉ. ए. डी. जाधव अनेक वर्षे क्यूबा सरकारला रेशीम शेतीच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करीत आहेत. त्याचा लाभ तेथील शेतकऱ्यांसह स्थानिक उद्योगांनाही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यांच्या योगदानाचा तेथील सरकारकडून पुरस्कार देऊन झालेला गौरव विद्यापीठासाठी आणि भारतासाठीही अभिमानास्पद क्षण आहे.**
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

क्यूबाचे विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण उपमंत्री जोस फिडेल सन्ताना न्युएझ यांच्या हस्ते आणि क्युबाच्या कम्युनिस्ट पक्षाचे प्रथम सचिव लुई अँटोनिओ टोरस इरिबर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. डॉ. जाधव यांच्यातर्फे क्यूबा येथील राष्ट्रीय रेशीम शेती प्रकल्पाच्या व्यवस्थापक अदिलैदिस रुईझ बार्सेनाजयांनी पुरस्कार स्वीकारला. क्यूबातील भारतीय राजदूत सर्वेसर्वन जानकीरामन यांनी डॉ. जाधव यांच्या क्यूबातील प्रकल्प स्थळाससदिच्छा भेट देऊन पाहणी केली. डॉ. जाधव यांच्यासह विद्यापीठाचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले.

या संदर्भातक्यूबा येथील 'सेंटर फॉर रिसर्च इन प्रोटिन प्लँट्स अँड बायोनॅचरल प्रोडक्ट्स'च्या सरसंचालक डॉ. मारिया डेल कार्मेन पेरेझ हमांडेझ यांच्याकडून डॉ. जाधव यांना प्राप्त झालेल्या पत्रात म्हटले आहे. ''क्यूबातील रेशीमशेती विकासाच्या मूल्यशृंखलेत झालेल्या प्रक्रिया, तांत्रिक, उत्पादन आणि संस्थात्मक नवकल्पनाराबविण्यासाठी डॉ. जाधव यांनी घेतलेल्या परिश्रमाच्या परिणामस्वरूप पुरस्कार दिला आहे.त्यांनी राबविलेल्या प्रमुख नवसंकल्पनांमध्ये तुतीच्या उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान,रेशीम कीटक वाढवण्याची पद्धती,रेशीम कीटकांची अंडी उत्पादनाची पद्धत,रोगांचे नियंत्रण आणि प्रतिबंध, कोश सुकवणे आणि रेशीम धागे मिळवणे या बाबींचा समावेश राहिला. प्रकल्पाद्वारे प्राप्त होणारी उत्पादने स्थानिक विकासात योगदान देतात आणि आर्थिक व सामाजिक लाभावर सकारात्मक परिणाम घडवित आहेत. या सर्वबाबींसाठी भारतासोबतच्या आणि विशेषत: त्यांच्या सहकार्याचे महत्त्व आहे. त्यासाठी त्यांना पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.'

पुढारी

# डॉ. विजय ककडे 'सेबी'चे अर्थसाक्षरता मार्गदर्शक

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विजय ककडे यांची 'सेबी'चे अर्थसाक्षरता मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून पुनश्च निवड करण्यात आली आहे.

डॉ. ककडे २०१२ पासून अर्थसाक्षरता विषयाच्या अनुषंगाने व्याख्यानांच्या माध्यमातून जनजागृती करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांनी बचत गट, युवक, कर्मचारी, महिला गट, सेवानिवृत्त कर्मचारी अशा विविध घटकांना मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत. ग्राहकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, त्यांना योग्य गुंतवणूक व अर्थ नियोजन या अनुषंगाने 'सेबी'मार्फत मोफत व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते.

उपक्रमांतर्गत विविध सामाजिक घटकांना आर्थिक नियोजनविषयक मार्गदर्शन डॉ. ककडे करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# 'सेबी'चे अर्थसाक्षरता मार्गदर्शकपदी डॉ. विजय ककडे यांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विजय ककडे यांची 'सेबी'चे अर्थसाक्षरता मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून पुनश्च निवड करण्यात आली आहे. विद्यापीठासह परिक्षेत्राबाहेरही डॉ. विजय ककडे यांचा अर्थतज्ज्ञ व मार्गदर्शक म्हणून लौकिक आहे.

'सेबी' अर्थात 'भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ, मुंबई' यांच्याकडून अर्थसाक्षरता मार्गदर्शक नामिकातज्ज्ञ म्हणून त्यांची मंडळावर पुनश्च निवड करण्यात आली आहे. डॉ. ककडे २०१२ पासून अर्थसाक्षरता विषयाच्या अनुषंगाने सातत्याने व्याख्यानांच्या माध्यमांतून जनजागृती करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांनी बचत गट, युवक, कर्मचारी, महिला



गट, सेवानिवृत्त कर्मचारी अशा विविध घटकांना मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत.

ग्राहकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, तसेच त्यांना योग्य गुंतवणूक व अर्थ नियोजन या अनुषंगाने 'सेबी'मार्फत मोफत व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत विविध सामाजिक घटकांना आर्थिक नियोजनविषयक मार्गदर्शन डॉ. ककडे करणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सकाळ

# प्रा. डॉ. विजय ककडे सेबीचे अर्थसाक्षरता मार्गदर्शक



डॉ. विजय ककडे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विजय ककडे यांची 'भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ, मुंबई'चे (सेबी) अर्थसाक्षरता मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून पुन्हा निवड झाली. डॉ. ककडे २०१२ पासून अर्थसाक्षरता विषयाच्या अनुषंगाने सातत्याने व्याख्यानांच्या माध्यमांतून जनजागृती करीत आहेत. त्यांनी बचत गट, युवक, कर्मचारी, महिला गट, सेवानिवृत्त कर्मचारी अशा विविध घटकांना मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत. ग्राहकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, तसेच त्यांना योग्य गुंतवणूक व अर्थ नियोजन या अनुषंगाने 'सेबी'मार्फत मोफत व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमाअंतर्गत विविध सामाजिक घटकांना आर्थिक नियोजनविषयक मार्गदर्शन ते करणार आहेत.

12 FEB 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लावणीचा ठेका पंजाबात, भांगडा रंगणार कोल्हापुरात

## 'कल्चरल एक्स्चेंज'मध्ये उलगडणार संस्कृतीचे रंग

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ व फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठात 'कल्चरल एक्सचेंज'चा अनोखा प्रयोग होणार आहे. विद्यापीठाचा सांस्कृतिक संघ महाराष्ट्राची संस्कृती पंजाबमध्ये जाऊन सादर करणार असून, लव्हली विद्यापीठाचा संघही कोल्हापुरात येणार आहे. 'आजादी का अमृतमहोत्सव' व विद्यापीठाच्या 'हीरक महोत्सवी'' वर्षाचे औचित्य साधून प्रथमच हा प्रयोग होत आहे. विद्यापीठाचा ४० जणांचा संघ एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात पंजाबला रवाना होईल.



महाराष्ट्र व पंजाबच्या संस्कृतीचे आदान-प्रदान करण्याचा हा उपक्रम आहे. त्याला व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाल्यानंतर लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता सौरभ लखनपाल यांच्याशी संपर्क साधला होता. त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद आला. त्यांनी विद्यापीठाच्या सांस्कृतिक संघाला लव्हली विद्यापीठात येण्याचे आमंत्रण दिले.

> **"महाराष्ट्र व पंजाबच्या संस्कृतीचे आदान-प्रदान व्हावे या अनुषंगाने हा सांस्कृतिक करार केला आहे. त्याअंतर्गत अभ्यास सहलीतून विद्यार्थ्यांना खूप काही शिकायला मिळेल.**
> **- डॉ. आर. व्ही. गुरव, संचालक, विद्यार्थी विकास विभाग**